आकाशवाणी नागपूर,
(मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५

ठळक बातम्या

1. रोजगार मेळाव्याअंतर्गत, पंतप्रधान उद्या सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या युवकांना 51,000 हजाराहून अधिक नियुक्ती पत्रे करणार प्रदान, नागपूरच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती.
2. सरकारी जमिनींवरच्या अतिक्रमणाला जबाबदार असलेल्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा राज्य सरकारचा विचार.
3. नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासणार नाही- जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची ग्वाही.

आणि

4. राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी 2023-25च्या तुकडीचा पहिला दीक्षांत सोहळा उद्या: राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन करणार दीक्षांत भाषण.

----------

रोजगार मेळावा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या 12 जुलै रोजी सकाळी 11 वाजता दूरदृश्य प्रणालीद्वारे विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या युवकांना 51,000 हून अधिक नियुक्ती पत्रे वितरित करणार आहेत. याप्रसंगी ते उपस्थितांना संबोधित देखील करतील. देशभरातील रोजगार मेळयांमधून आतापर्यंत १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत. देशभरातील 47 ठिकाणी 16वा रोजगार मेळा आयोजित केला जाणार आहे. नागपूर इथं आयोजित रोजगार मेळयाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती राहणार असून मंगल मंडप, कडबी चौक, कामठी रोड इथे हा कार्यक्रम आयोजिण्यात आला आहे, अशी माहिती दक्षिण पूर्व मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांनी पत्रकाद्वारे दिली.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातल्या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विचार सुरू आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. राज्यातील वन विभागाच्या बाहेर असणाऱ्या बफर झोनमधल्या शेतजमिनी वार्षिक भाड्याने घेऊन त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प अथवा सुगंधी गवत लावलं जाईल, अशी माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. जंगली प्राण्यांच्या भीतीमुळे या ठिकाणी शेती होत

नसल्याचा मुद्दा सुलभा खोडके यांनी उपस्थित केला होता. वन विकास महामंडळाकडून वार्षिक पन्नास हजार रुपये भाड्याने घेऊन त्यावर हे प्रकल्प राबविण्यात येतील, महसूल आणि वन विभागाने एकत्रितरित्या हा निर्णय घेतल्याचं वनमंत्री म्हणाले.

जन सुरक्षा विधेयक

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक विधानसभेनं काल संमत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक सदनासमोर सादर केलं. देशाच्या व्यवस्थेवर घाला घालणाऱ्यांविरोधात कडक कायदे करण्याची गरज व्यक्त करत, असा कायदा करण्यामागची भूमिका मुख्यमंत्र्यांनी सदनात स्पष्ट केली.

*बिल कुठल्याही लोकतांत्रिक प्रक्रियेच्या विरुद्ध नाही. कोणाचाही आंदोलनाचा अधिकार हे काढून घेत नाही कोणत्याही लोकशाही मानणाऱ्या आणि भारताचं संविधान मानणाऱ्या संस्थेवर किंवा संघटनेनेवर कुठलाही घाला घालणारं हे बिल नाही तर केवळ आणि केवळ नक्षलवादी आणि माओवादी चळवळीशी संबंधित ज्या फ्रंटल ऑर्गनायझेशन्स आहेत त्या ऑर्गनायझेशन्सला बॅन करण्याकरता ही बिल तयार करण्यात आलेले आहे.*

या विधेयकावरच्या चर्चेत सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत, जयंत पाटील, वरुण सरदेसाई, भास्कर जाधव तसंच कम्युनिस्ट पक्षाचे विनोद निकोले यांच्यासह अनेक सदस्यांनी सहभाग घेत, आपली मतं मांडली.

युवा धोरण समिती

विकसित भारत २०४७ हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी युवकांच्या बदलत्या विचारसरणीला स्वीकारणं अत्यावश्यक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल युवा धोरण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या धोरणात नव्या आव्हानांना तोंड देणाऱ्या युवकांचा समावेश करुन शहरी आणि ग्रामीण युवकांना समान संधी मिळण्यासाठी प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

डॉ.पंकज भोयर- विधान परिषद

आदिवासी भागातील शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना वेतन देण्यात होणाऱ्या विलंबावर राज्य शासन गांभीर्याने विचार करत असून लवकरच यामध्ये सुसूत्रता आणण्यात येईल, अशी माहिती गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, सहकार, खनिकर्म, शालेय शिक्षण राज्यमंत्री

डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य किरण सरनाईक आणि भाई जगताप यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प

पश्चिम विदर्भासाठी महत्त्वाचा असणारा नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. यासाठी आताच्या सर्वेक्षणानुसार ८९ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित असून या माध्यमातून १५ तालुक्यांमधील ३ लाख ७२ हजार हेक्टरहून अधिक जमीन सिंचनाखाली येईल. तीन टप्प्यात पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे जलसंपदा विदर्भ, तापी आणि कोकण खोरे विकास महामंडळ, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अभिजित वंजारी यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. महाजन म्हणाले की, दुष्काळी भागासाठी महत्त्वाचा ठरणाऱ्या नळगंगा- पैनगंगा प्रकल्पासाठी केंद्र शासनही मदत करणार आहे. विदर्भातील निम्न पैनगंगा प्रकल्पाबाबत वर्कआऊट सुरू असून जिगाव, गोसेखुर्द या प्रकल्पांना सुद्धा निधी उपलब्ध करून दिला आहे. वर्धा जिल्ह्यातील बोर आणि धाम प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता लवकरच देण्यात येईल. तसेच कोकण विभागातील प्रकल्पांनाही गती देण्यात येईल. महामंडळातील आकृतीबंध अंतिम टप्प्यात असून तो अंतिम झाल्यावर रिक्त पदे भरली जातील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

एनएडीपी

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी NADP 2023-25 च्या तुकडीचा पहिला दीक्षांत सोहळा उद्या दि.12 जुलै रोजी संध्याकाळी साडेचार वाजता उत्सव हॉल, NADP परिसर इथं आयोजित करण्यात आला असून या सोहळ्याला राज्यपाल सीपी राधाकृष्णन दीक्षांत भाषण करणार आहेत.

सामंजस्य करार

केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या वतीने, नागपूर येथील प्रादेशिक आयुर्वेद संशोधनाचे सहाय्यक संचालक डॉ.एम.एन. सूर्यवंशी आणि वर्धा येथील सावंगी येथील रजिस्ट्रार दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था यांनी आयुष प्रकल्पाच्या परिणामाबाबत डीएम २ मध्ये सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी केली. या समारंभात, प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ.यू.आर.शेखर नंबुद्री, डॉ.पूनम सावरकर तसंच सह-संशोधक डॉ.मनीष देशमुख आणि डॉ.सुमेध पाईकराव यांनीही सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

डॉ.राजेंद्र काकडे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख पदाचा भार डॉ. राजेंद्र काकडे यांनी स्वीकारला. डॉ. काकडे हे वर्ष २००३ पासून विद्यापीठात कार्यरत आहेत. २००९ पासून ते प्राध्यापक म्हणून तर २०१९ पासून वरिष्ठ प्राध्यापक म्हणून

शैक्षणिक कार्य करीत आहेत. या व्यतिरिक्त त्यांनी ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत विद्यापीठाचं प्र-कुलगुरू पद देखील सांभाळलं आहे.

भारत आणि इंग्लंड क्रिकेट

भारत आणि इंग्लंडदरम्यान सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात इंग्लंड आपल्या पहिल्या डावात आज चार बाद २५१ धावांपासून पुढे खेळत आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या सात गडी बाद 353 धावा झाल्या होत्या. इंग्लंडतर्फे जो रूट नं सर्वाधिक 104 धावांची खेळी केली, तर कर्णधार बेन स्टोक्स आणि जेमी स्मिथ यांनी धावसंख्येला आकार दिला. भारतातर्फे जसप्रीत बुमराहने चार गडी बाद केले असून नितेश कुमार रेड्डीने दोन तर जडेजानं एक गडी बाद केला.

हवामान

संपूर्ण विदर्भात उद्या तुरळक ठिकाणी पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आज देखील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर या ठिकाणी पावसाचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे.

देशासाठी मध्यस्थी

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण तसेच मध्यस्थी आणि सामंजस्य प्रकल्प समिती नवी दिल्ली आणि सर्वोच्च न्यायालयाने विशेष मध्यस्थी मोहिमेची संकल्पना मांडली आहे. ‘देशासाठी मध्यस्थी मोहीम’ अंतर्गत देशातील सर्व तालुका न्यायालये, जिल्हा न्यायालये आणि उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी ९० दिवसांची विशेष मध्यस्थी मोहीम दि. १ जुलै २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान सुरू करण्यात आली आहे. नागपुरात डीपी सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. संबंधितांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असं आवाहन नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे करण्यात आलं आहे.

क्रॉस कंट्री रेस स्पर्धा

नागपूर पश्चिम सेक्टर, सीआरपीएफ मुंबई अंतर्गत प्रशासकीय आणि ऑपरेशनल बटालियन आणि कार्यालयांमधील क्रॉस कंट्री रेस स्पर्धा अंतर्गत ग्रुप सेंटर सीआरपीएफ नागपूर कॅम्पसमध्ये ९ जुलै रोजी सुरू झालेल्या क्रॉस कंट्री स्पर्धेचे आज समापन झाले. या कार्यक्रमाचा उद्देश दलातील कर्मचाऱ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक कणखरता, सहनशक्ती आणि परस्पर सहकार्याची भावना वाढवणे हा होता. स्पर्धेत ग्रुप सेंटर नागपूर, पुणे, गांधीनगर आणि २४२ बटालियनच्या सैनिकांनी उत्साहाने भाग घेतला.

स्थानिक स्वराज्य संस्था

मतदार संख्या, मतदार केंद्र, उपलब्ध इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका घेण्यासंदर्भात नियोजन सुरू असून त्यासाठी 1 जुलै 2025 पर्यंत नावे नोंदविलेली विधानसभेची मतदार यादी वापरण्याचं नियोजन करण्यात येत आहे. त्यादृष्टीने तयारी करावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज दिले. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या आगामी निवडणुकांच्या प्राथमिक तयारीसंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

******